<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१०५८/२०१९ मधील</u>
<u>निशाणी क्र.५ वरील आदेश</u>
<u>CNR No.MHST180006122019</u>

**रामचंद्र गुलाब सावंत व इतर**
**विरुद्ध**
**गणेश हणमंत बोटे व इतर**

(दिनांक **१४ मार्च, २०२२** रोजी पारित केला)

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ नियम १ अन्वये प्रतिवादीने वादीच्या मौजे गादेवाडी, तालुका खटाव, जि. सातारा येथील गट क्र.१४३, क्षेत्र ५ हेक्टर ३१आर यातील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशा तुर्तातुर्त ताकीदीसाठी दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.२ हिच्या बहिणीचा मुलगा असून प्रतिवादी क्र.३ हा प्रतिवादी क्र.२ हिचा भाऊ आहे. प्रतिवादी क्र.२ ही साहेबराव याची पत्नी असून साहेबराव हा वादी यांचा चुलता आहे. दिनांक १४.१२.१९७७ रोजी साहेबराव यांनी प्रतिवादी क्र.३ च्या वडीलांकडून वाद मिळकत खरेदी घेतली होती. तेव्हापासून तो वादी मिळकतीचा कब्जेदार होता. परंतू प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी साहेबराव याचा शारीरिक व मानसिक छळ केला व त्या कारणाने साहेबराव त्याच्या मुळ गावी म्हणजेच वादींकडे येवून राहू लागले. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ हिने साहेबराव याचे विरुद्ध नियमित दिवाणी दावा क्र.११०/२०१६ हा पोटगीसाठी दाखल केला. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.३ याने साहेबराव याचेविरुद्ध नियमित दिवाणी दावा क्र.२११/२०१६ हा दावा दाखल केला. या दोन्ही दाव्यात मनाई अर्ज दाखल केले व त्या अन्वये साहेबराव याने मिळकतीचे हस्तांतरण करु नये तसेच त्या दाव्यातील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा आदेश पारीत केला. परंतू सदरहू दावा दाखल होण्यापूर्वीच साहेबराव याने दिनांक ११.०७.२०१६ रोजी साक्षीदारांसमक्ष मृत्युपत्रान्वये वाद मिळकत वादींच्या नावे करुन त्यांच्या कब्जे वहिवाटीत

दिलेली आहे. त्यानंतर दिनांक ०२.१०.२०१६ रोजी देखील पुरवणी मृत्युपत्र केलेले आहे. त्या मृत्युपत्राच्या आधारे वादींनी त्यांचे नावांची नोंद महसुल अभिलेखात होणेसाठी अर्ज दाखल केला असता तक्रार रजिस्टर नं.१/२०१६ अन्वये सदरहू नोंद रद्द केली. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद संदर्भ प्रकरण प्रलंबीत आहे. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे देखील दोन्ही दाव्यातील निशाणी ५ कडील मनाई अर्जावरील आदेशास आव्हान देण्यात आलेले आहे. असे असताना प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र.२ कडून दिनांक १८.०१.२०१९ रोजी बेकायदेशीरपणे कब्जाचा दस्त करुन घेतला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादींनी वादी हे मृत्युपत्राने मालक झाला आहे हे जाहीर होवून मिळणेसाठी, तसेच दिनांक १८.०१.२०१९ रोजीचा खरेदीदस्त बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळण्यासाठी त्याचप्रमाणे नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ व २११/२०१६ मध्ये निशाणी ५ वरील आदेश वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून मिळण्यासाठी आणि प्रतिवादींनी वादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशा निरंतर ताकीदीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला. सदरहू दाव्यात विचाराधीन असलेला तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी १७ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली. त्यांनी असे कथन केले की, साहेबराव हा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेसोबत राहात होता. त्यावेळी साहेबराव यांचे नावावर नाममात्र खरेदीदस्त सन १९७७ साली केला होता. साहेबराव व प्रतिवादी क्र.२ यांना कोणतेही अपत्य नसल्याने त्यांनी प्रतिवादी क्र.१ यास लहानपणापासून मुलाप्रमाणे वाढविले. दिनांक २९.१०.२०२०१० रोजी करारनाम्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हा वाद मिळकतीचा कब्जेदार आहे. तसेच दिनांक २९.०७.२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या नावे कुलमुखत्यारपत्र देखील करुन दिले आहे. त्याआधारे प्रतिवादी क्र.३ यास प्रतिवादी क्र.१ ने ५ वर्षांसाठी वाद मिळकत खंडाने वहिवाटीस दिलेली आहे. प्रतिवादी क्र.२ याने दिनांक २१.०३.२०१६ रोजी साहेबराव याचे विरुद्ध दावा दाखल करुन साहेबराव

याने मिळकतीचे हस्तांतरण करु नये यासाठीचा अर्ज केला होता तो अर्ज न्यायालयामार्फत मंजूर झालेला आहे. त्याची माहिती असताना देखील दिनांक ११.०७.२०१६ रोजी व दिनांक ०२.१०.२०१६ रोजी मृत्युपत्राचा बनावट दस्त अस्तित्वात आणलेला आहे. त्याचप्रमाणे नियमीत दिवाणी दावा क्र.२११/२०१६ मधील वादींचे मनाई अर्ज मंजूर झालेले असून त्यावरील मा. जिल्हा न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय यांचेकडे दाखल केलेली अपीले नामंजूर झालेली आहेत. इत्यादी कारणांवरुन प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादींतर्फे निशाणी १९ कडे व प्रतिवादींतर्फे निशाणी २९ कडे लेखी युक्तीवाद दाखल केलेले आहेत. त्यांनी अनुक्रमे अर्ज व त्यांचे म्हणणे या अनुषंगाने युक्तीवाद केला.

५. खालील मुद्दे माझ्या विचारासाठी निष्पन्न झाले व त्यावरील निष्कर्ष पुढील कारणांचे आधारे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथम दर्शनी केस असल्याचे शाबीत करतात काय ? | नाही |
| २. | सोयीचे संतुलन कोणाच्या बाजूने आहे ? | प्रतिवादीच्या |
| ३. | वादी हे तुर्तातूर्त मनाई हुकुम न दिलेस त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असल्याचे शाबीत करतात काय ? | नाही |
| ४. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते ४ बाबतः–</u>**

६. सोयीकरीता सर्व मुद्दे मी एकत्रीत विचारात घेत आहे. वादीतर्फे निशाणी ३ कडील यादीसोबत खाते क्र.१९३, गट क्र.१४३ याचा उतारा, तसेच गावकामगार तलाठी

यांना दिलेल्या पत्राची प्रति, मृत्युपत्राची छायांकित प्रत, दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्रात दिलेली जाहीर नोटीस, मंडल अधिकारी यांचा आदेश, तक्रार रजिस्टर नं.१/२०१६ यातील निकालाची समज, नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ मधील निशाणी १ ची प्रति, तसेच नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ मधील निशाणी ५ वरील आदेश, नियमीत दिवाणी दावा क्र.२११/२०१६ मधील दाव्याची प्रत, प्रतिवादी यांनी साहेबराव यांना दिलेल्या कुलमुखत्यारपत्राची तसेच प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.२ ने करुन दिलेल्या खरेदीदस्ताची छायांकित प्रत दाखल केलेली असून साक्षीदार गुलाब अमर साबळे व मोहन व्यंकट सावंत यांची शपथपत्रे देखील दाखल केलेली आहेत.

७. याउलट प्रतिवादीतर्फे निशाणी २८ कडील यादीसोबत मा. उच्च न्यायालय येथील रिट पिटीशन नं.२८४३/२०१९ मधील हुकूमाची छायांकित प्रत, नियमीत दिवाणी दावा क्र.२११/२०१६ मनाई अर्जावरील आदेश, तसेच दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२४/२०१६ मधील निकालाची प्रत, नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ मधील मनाई अर्ज व त्यावरील आदेश, दिनांक २८.०९.२०१० रोजीचा करारनामा, खंड पावती, कुल मुखत्यारपत्र, फेरफार क्र.३५७, १४३, ३५३, दिनांक १८.०२.२०१९ चे खरेदी दस्त १९८/२०१९ आणि १९९/२०१९ हे दाखल केलेले आहेत.

८. मी या ठिकाणी नमुद करु इच्छितो की, वादी हा साहेबराव याने करुन दिलेल्या मृत्युपत्राच्या अन्वये वाद मिळकतीचा मालक व कब्जेदार झाल्याचे कथन करत आहे. प्रतिवादींनी त्यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त हुकूमाची मागणी करत आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी वादींनी ते वाद मिळकतीचे कब्जेदार असल्याचे शाबीत करणे आवश्यक आहे. निशाणी ९ कडील ७/१२ उता–यावरुन कब्जेदार सदरी साहेबराव याचे नाव असल्याचे दिसुन येते. मी या ठिकाणी नमुद करु इच्छितो की, साहेबराव याचेविरुद्ध नियमीत दिवाणी दावा क्र.२११/२०१० हा दाखल केला होता हे वादात नाही. त्याचप्रमाणे त्या दोन्ही

दाव्यात साहेबराव याचे विरुद्ध मनाई आदेश पारीत करण्यात आलेला होता हे देखील वादात नाही.

९. वादींच्या कथनानुसार नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ हा दाखल होण्यापूर्वीच दिनांक ११.०७.२०१६ रोजी साहेबराव याने मृत्युपत्र करुन वाद मिळकत वादींच्या कब्जात दिली होती. त्या अनुषंगाने नियमीत दिवाणी दावा क्र. ११०/२०१६ हा दिनांक २१.०३.२०१६ रोजी दाखल झाल्याचे निशाणी ३ कडे अनु. क्र. ६ कडे दाखल असलेले दाव्याच्या प्रती वरुन दिसुन येते. त्याचप्रमाणे सदरहू दाव्यातील निशाणी ५ कडील आदेशाची प्रत निशाणी ३/७ कडे दाखल केलेले आहे. त्यावरुन असे दिसुन येते की दिनांक १३.०९.२०१६ रोजी साहेबराव याने मिळकतीचे कसलेही प्रकारे हस्तांतरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत केला आहे. यातील वादींनी साहेबराव याने दाखल केलेल्या कैफियतीची प्रत या प्रकरणात दाखल केली नाही. नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ मधील निशाणी ५ कडील आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरहू आदेशात साहेबराव याने मृत्युपत्र करुन दिले होते किंवा कसे याबाबत साहेबराव याने न्यायालयासमोर कसलेही कथन केलेले नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, मृत्युपत्र हे नियमीत दिवाणी दावा क्र.११०/२०१६ हा दाखल झाल्यानंतर करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे नियमीत दिवाणी दावा क्र.२११/२०१६ यातील निशाणी ५ कडील मनाई आदेशावरुन हे स्पष्ट होते की साहेबराव याने त्या दाव्यातील वादी म्हणजेच या दाव्यातील प्रतिवादी क्र.३ याचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा अंतरिम मनाई आदेश पारीत केला होता. त्याचप्रमाणे दिवाणी किरकोळ अपील क्र.२६/२०१६ याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरहू आदेश मा. जिल्हा न्यायालय, वडूज यांनी कायम केला आहे. वादींनी मा. उच्च न्यायालयात त्यांचेविरुद्ध दाद मागितली असल्याचे कथन केले असले तरी प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र.२८७३/२०१९ यातील आदेशाची प्रत दाखल केली आहे. त्यावरुन असे दिसुन येते की, साहेबराव याने दाखल

केलेला अर्ज मा.उच्च न्यायालयामार्फत देखील फेटाळण्यात आलेला आहे. म्हणजेच हे स्पष्ट होते की, नियमीत दिवाणी दावा क्र.२११/२०१६ या दाव्यात प्रतिवादी क्र.३ सदाशिव हा कब्जेदार असल्याचा निष्कर्ष नोंदवून साहेबराव याचेविरुद्ध मनाई आदेश पारीत केलेला आहे. अशा वेळी तद्नंतर साहेबराव याचे कडून वादींनी वाद मिळकतीचा कब्जा कधी घेतला हे वादींनी शाबीत करणे आवश्यक आहे. परंतू त्याबाबत वादींनी कसलाही पुरावा दाखल केलेला नाही. जेव्हा नियमीत दिवाणी दावा क्र. २११/२०१६ या दाव्यात प्रतिवादी क्र.३ हा कब्जेदार असल्याचे प्रथमदर्शनी निष्कर्ष काढलेले असताना त्यांचेविरुद्ध दाखल केलेले किरकोळ अपील व मा. उच्च न्यायालयातील पिटीशन नामंजूर झाले असताना वादी हे वाद मिळकतीचे कब्जेदार आहेत असे म्हणता येणार नाही. या कारणाने वादीतर्फे केलेले साक्षीदाराचे शपथपत्र हे या वेळी विचारात घेता येणार नाही.

१०. वादीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालयाचे **मिनाक्षीम्मल विरुद्ध चंद्रशेखरन [२००५(१)बीसीजे २७१](एससी), पपय्या सास्त्री विरुद्ध स्टेट ऑफ आंध्रप्रदेश [२००७(३)सिव्हील एल जे १७] , सुरज लॅंप आणि इंडस्ट्रिज प्रा. लि. विरुद्ध स्टेट ऑफ हरयाणा [२०११ (३) बीसीजे ५७९ (एससी)], नानोभा सखाराम वाशीवाले विरुद्ध नानोभा धोंडीबा भारेकर २०१५(१) बीओएम. सी. आर. १३५,** मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे **म्युनसिपल कौन्सील शिर्डी विरुद्ध सौ. सोनिया देविदास पाटील २००९(२)ऑल एम आर ८४७, मलम्मा के. नंदैय्या पोछय्या विरुद्ध रामकृष्ण त्रिंबकराव दानी [२००७(१) बीसीजे ५५३], केशरीमल जिवजी शहा विरुद्ध बॅंक ऑफ महाराष्ट्र [२००४ (४) महा एल आर २०१],** मा. सर्वोच्च न्यायालयाचे **दादू दयालू महासभा, जयपूर विरुद्ध महंत राम निवास २००९(१) ऑल एम आर ९६५,** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे **शामराव गणपत चिंतामणी विरुद्ध काकासाहेब लक्ष्मण गोरडे २००८(२) ऑल एम आर ११८** या न्यायनिर्णयांचा आधार घेतला. परंतू सदरहू न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती माझे समोरील प्रकरणातील वस्तुस्थितीपेक्षा भिन्न आहे. यापूर्वीच प्रतिवादी क्र.३ हा वाद मिळकतीचा कब्जेदार असल्याचे निष्कर्ष नोंदवून

साहेबराव याचेविरुद्ध मनाई आदेश पारीत केलेला आहे व तो आदेश मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे कायम झालेला आहे. त्यामुळे सदरहू न्यायनिर्णय हे वादींच्या उपयोगाचे नाहीत असे मी नम्रपणे नमुद करतो.

११. वादी हे वाद मिळकतीचे कब्जेदार असल्याचे शाबीत करण्यात अपयशी ठरल्याने त्यांना प्रथमदर्शनी केस नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देतो व मुद्दा क्र.४ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करतो.

**<u>आ दे श</u>**

१) निशाणी नं. ५ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहिल.

KIRAN CHANDRAHAS MANE

Digitally signed by KIRAN CHANDRAHAS MANE
Date: 2022.03.17 16:47:13 +0530

ठिकाण – वडूज ( कि. चं. माने )
दिनांक – १४.०३ .२०२२ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, वडूज

(क. अ. जगताप ) लघुलेखिका